क्रमांक : पोमसं/१६-(अ-ब)/७३१५/लेखापरिक्षण अनुपालन/०१/२०१८ मुंबई, दि. १६ /०२/२०१८

**विषय : महालेखापाल यांचे लेखा परिक्षण...**
आक्षेप / परिच्छेदांचा अनुपालन अहवाल सादर करताना घ्यावयाची सावधगिरी...

*****

**परिपत्रक:-**

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचे संबंधित कार्यालयामार्फत त्यांचे अधिनस्त पोलीस घटक कार्यालयांचे लेखापरिक्षण केले जाते. प्रस्तुत लेखापरिक्षणादरम्यान, त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या, घटक कार्यालयातील सर्व प्रशासकीय व लेखाविषयक कामकाज आणि निगडीत असलेले सर्व अभिलेख यांचे लेखापरिक्षण केल्यानंतर त्यामध्ये निदर्शनास आलेल्या कामकाज कार्यपद्धतीतील त्रुटी वा उणिवा, नियमांचे व अधिकारांचे उल्लंघन याबाबत अंतिम आक्षेप/ परिच्छेद नोंदविण्यापूर्वी, लेखापरिक्षण पथक, संबंधित आक्षेप / परिच्छेदांवर त्या-त्या कार्यालयाचे स्पष्टीकरण अर्धसमास (Half Margin) पद्धतीनुसार त्याच वेळी मागवुन घेत असते. त्यानुसार योग्य स्पष्टीकरणासह आक्षेप / परिच्छेदांचे त्याचवेळेस (On the Spot) व त्वरित निराकरण केले जाते. मात्र आक्षेप/ परिच्छेदास अनुसरुन न दिलेले स्पष्टीकरण अथवा तत्कालिन प्रचलित नियम, शासन निर्णय, सुयोग्य अभिलेख इ. अभावी दिलेले व आक्षेपाच्या मुद्याबाहेरील स्पष्टीकरण यामुळे आक्षेप/ परिच्छेद इतर गंभिर स्वरुपाचे आक्षेप महालेखापाल यांचे लेखापरिक्षण टिप्पणीमध्ये समाविष्ट केले जातात, असे निदर्शनास आले आहे.

२. महालेखापाल यांनी त्यांचे लेखा परिक्षणादरम्यान उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण तातडीने करुन न घेतल्यास आणि आक्षेप दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यास ते आक्षेप लोकलेखा समितीकडे वर्ग होण्याची शक्यता असते. लोकलेखा समितीसमोर ठेवण्यात आलेल्या अशा आक्षेपांसाठी अपर मुख्य सचिव (गृह) व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना समिती समोर साक्ष देण्यासाठी उपस्थित राहावे लागते. त्या विषयी पोलीस महासंचालक यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हि बाब घटक प्रमुखांनी कृपया गांभिर्याने घ्यावी.

३. घटक कार्यालयात लेखा विषयक कामकाजामध्ये महाराष्ट्र कोषागार नियम-१९६८, मुंबई वित्तिय नियमावली-१९५९, महाराष्ट्र नागरी सेवा नियम-१९८१, महाराष्ट्र पोलीस नियमावली-१९५९, वेळोवेळी सुधारीत शासन खरेदी नियमावली, तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले नियम / निर्णय / आदेश / परिपत्रके यामधील तरतुदींचा अवलंब केला जात नाही. अंतर्गत लेखा परिक्षणामध्येही याबाबत योग्य त्या सुचना देऊनही कामकाजामध्ये सुधारणा केली जात नाही. याच कारणासाठी महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांचे लेखा परिक्षणामध्येही अंतर्गत लेखा परिक्षणाबाबत प्रकर्षाने निर्देश दिलेले असतात.

४. महालेखापाल यांचे प्रलंबित लेखा आक्षेप/ परिच्छेदांचे निराकरण करण्यासाठी या कार्यालयामार्फत वेळोवेळी पत्रे, स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे यासाठी संबंधितांना या कार्यालयात प्रत्यक्ष बोलावुन त्यांचे सोबत बैठका घेऊन खास मोहिमा आयोजित करण्यात आल्या आहेत. मात्र तरीही यास फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे काही परिच्छेद व आक्षेप हे दीर्घ कालावधीपर्यंत प्रलंबित राहिले आहेत. हि

बाब निश्चितच भूषणावह नाही. आक्षेप / परिच्छेद दीर्घ काळ प्रलंबित राहिल्याने अशा आक्षेप / परिच्छेदांमधील गांभिर्य तर नष्ट होतेच परंतु काही प्रसंगी अनेक प्रशासकीय कारणास्तव उदा.: संबंधित कर्मचाऱ्याची बदली, अभिलेख वा नस्ती विस्मरणात जाणे, आक्षेप / परिच्छेदाची पार्श्वभूमि विस्मरणात जाणे इ. कारणांमुळे त्यांचा निपटारा करण्यास अडचणी निर्माण होतात आणि त्यांचे निराकरणाबाबत उदासिनता अधिक प्रमाणात वाढीस लागते. यामुळे घटक कार्यालयाचे दैनंदिन कामकाजावरही विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

५. त्याचप्रमाणे असेही निदर्शनास आले आहे की, दीर्घ काळ प्रलंबित राहिलेल्या आक्षेप/ परिच्छेदांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापाल यांना सादर करताना आक्षेप/ परिच्छेदांतील मुख्य मुद्दा विचारात न घेता, त्यासंबंधित अभिलेख व नियमातील तरतुदी न तपासता मुद्याबाहेरील स्पष्टीकरणे सादर केली जातात. त्यामुळे आक्षेप/ परिच्छेदांवर अतिरिक्त आक्षेप निर्माण होतात. या सर्व बाबी टाळण्यासाठी आक्षेप/ परिच्छेदांवर स्पष्टीकरणात्मक ज्ञापने सादर करताना घटक प्रमुखांनी खालील बाबींची दक्षता घ्यावी:-

अ) महालेखापाल यांचे लेखापरिक्षण पथकास सर्व अभिलेख उपलब्ध करण्यात येऊन आक्षेप/ परिच्छेदांचे शक्यतो त्याच वेळी (On the Spot) निराकरण करण्यात यावे.

आ) स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मुख्य आक्षेपास अनुसरुन, त्याबाबतचा सर्व विद्यमान व जूना अभिलेख तपासुन व नियमांतील तरतुदींसह व प्रतीसह सादर करण्यात यावीत.

इ) स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लेखापरिक्षणानंतर कोणत्याही परिस्थितीत एक महिन्याचे आत सादर करावीत.

ई) नविन व जुन्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांबाबत अतिरिक्त माहिती सादर करताना ती त्यापूर्वी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाशी सातत्य राखणारी व पुरक असावी आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये विसंगत असु नये.

उ) स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामधील रकमांचा ताळमेळ सर्व सहायक (Supporting) अभिलेखानुसार असावा आणि त्यामधील परिगणना व बेरिज-वजाबाकी अचूक असावी.

ऊ) अभिलेखातील प्राप्त माहितीचे विश्लेषण व विवेचन योग्य व अचूक असावे.

ए) स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मुख्य मुद्यास अनुसरुन संक्षिप्त स्परुपात असावित व त्यासोबत सहायक अभिलेख असावा.

ऐ) **सर्व स्पष्टीकरणात्मक ज्ञापने घटक प्रमुखांनी स्वत: वाचून सुयोग्य स्पष्टीकरणे सादर करावीत.**

ओ) लेखापरिक्षण पथकाने लेखापरिक्षणासाठी मागविलेला कोणताही अभिलेख अथवा स्पष्टीकरणात्मक ज्ञापने त्यांना विहित मर्यादेत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. अभिलेख वा स्पष्टीकरणात्मक ज्ञापने सादर करताना संबंधित कर्मचारी रजेवर आहे अथवा गैरहजर आहे अशा सबबी सांगण्यात येऊ नये.

औ) आवश्यक तेथे महालेखापाल कार्यालयाकडे पाठपुरावा करुन तेथील संबंधित अधिकारी यांचेशी घटक प्रमुखांच्या प्रतिनिधीनी चर्चा करुन आक्षेपांचे निराकरण करण्यात यावे.

६.	तरी सर्व घटक प्रमुखांना याद्वारे सुचित करण्यात येते की, आक्षेप/ परिच्छेदांतील त्रुटी व उणिवांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे त्यांचे घटकातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सर्व आक्षेप / परिच्छेदांचे त्वरित निराकरण करण्यात यावे. **याउपरांतही प्रलंबित आक्षेप / परिच्छेदांचे निराकरण करण्यास टाळाटाळ होत असल्याचे अथवा त्यांची पूर्तता करण्यास संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याचे सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर नियमानुसार योग्य ती शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे त्याची नोंद त्याचे गोपनिय अहवालामध्येही घेण्यात येईल याबाबत त्यांना समज देण्यात यावी.**

( अनुपकुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळुन)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक (रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / प्रशिक्षण व खास पथके / दहशतवाद विरोधी पथके) / सागरी सुरक्षा व विशेष सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे / महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई / न.वि.अ., नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १६-अ
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३६ (५ प्रती)
स्थायी आदेश नस्ती.